॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Phone : (02462) 215525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 215572** **E-mail: dir.dsd@srtmun.ac.in**

जा.क्र./ वि.वि.वि./ २०२६-२७/९८ दिनांकः - २५ /०९/२०२६

## परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर.

मा. संचालक, विद्यापीठ उप परिसर पेठ, लातूर.

मा. संचालक, विद्यापीठ उप परिसर,परभणी.

मा. प्राचार्य, न्यू मॉडल डिग्री कॉलेज, हिंगोली.

मा. समन्वयक कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट.

विषय: लोकसभा सचिवालय अंतर्गत 'पार्लमेंटरी रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट फॉर डेमोक्रॅसीज (PRIDE)' उपक्रमात सहभागाबाबत एक मुलगी व एक मुलगा विद्यार्थी निवडीबाबत.

संदर्भ: लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली यांचे पत्र व निर्देश.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून आपणास अवगत करण्यात येते की, लोकसभा सचिवालय अंतर्गत कार्यरत असणाऱ्या 'पार्लमेंटरी रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट फॉर डेमोक्रॅसीज (PRIDE) तर्फे राष्ट्रीय नेत्यांना आदरांजली वाहण्यासाठी संसदेत आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय युवा सहभाग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजी आणि भारताचे माजी पंतप्रधान श्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या (०२ ऑक्टोबर २०२६) निमित्ताने हा विशेष कार्यक्रम नवी दिल्ली येथे होणार आहे. या कार्यक्रमासाठी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांमधून दोन विद्यार्थ्यांची (ज्यामध्ये एक विद्यार्थिनी असणे बंधनकारक आहे) निवड करावयाची आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निकर्ष व माहिती लागू राहील:

१. निवड प्रक्रिया: भारतीय राष्ट्रीय नेत्यांचे जीवन, कार्य आणि त्यांचे योगदान यावर आधारित ऑनलाइन बहुपर्यायी चाचणी (MCQ Test) आणि स्पर्धात्मक प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

२. प्रवास व निवास: निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवासाचा (जाण्या-येण्याचा) आणि राहण्याचा सर्व खर्च 'PRIDE, लोकसभा सचिवालय' यांच्यातर्फे करण्यात येईल.

३. नामांकन सादर करणे: इच्छुक आणि पात्र विद्यार्थी/विद्यार्थिनींच्या नामांकनाची माहिती सदरील **Link** : https://forms.gle/wu3pBKHyuYkn9HM38 गूगल फॉर्मद्वारे दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ५:०० वाजेपूर्वी सादर करणे अनिवार्य आहे. वेळेची अल्पता लक्षात घेता, आपल्या महाविद्यालयातील पात्र व होतकरू विद्यार्थ्यांची नावे तातडीने नोंदवावीत आणि या उपक्रमात जास्तीत जास्त सहभाग नोंदवण्याबाबत आपल्या स्तरावरून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, ही विनंती.

(डॉ. राजपालसिंह चिखलीकर)
संचालक
विद्यार्थी विकास विभाग

प्रत माहितीस्तव :

१) मा. कुलगुरू महोदय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
२) मा. प्र-कुलगुरू महोदय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

प्रत पुढील कार्यवाहीस्तव सादर :

१) मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. समन्वयक, “स्वयंसिद्धा ” स्त्रीशक्ती उपक्रम, प्रस्तुत विद्यापीठ.
३) सिस्टिम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ (विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी).